**आपले सरकार सेवा केंद्रांचे गुणवत्ता, मानांकन व सन्मान कार्यपध्दती निश्चित करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : आसेकें-२०२६/प्र.क्र.६३/मातं (E-1602482)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक: २३ जून, २०२६.

**संदर्भ:**

१. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सिओएम १००२/प्र.क्र.४०/०२/३९, दि.२३ ऑगस्ट, २००२.
२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मातंसं/प्र.क्र.२८/३९, दि.०३ डिसेंबर, २००८.
३. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मातंसं/२०१२/प्र.क्र.१५२/३९, दि.२३ मे, २०१२.
४. माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग शासन निर्णय क्र. मातंसं /०४७/१/२०१४/३९, दि.०५ सप्टेंबर, २०१४.
५. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.२८६/३९, दि.०९ ऑगस्ट, २०१६.
६. माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि.०५ डिसेंबर, २०१६.
७. माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि.१९ जानेवारी, २०१८.
८. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. आसेकें-१७२५/प्र.क्र.८६/मातं (३९), दि.२७ मार्च, २०२५.
९. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग शासन निर्णय आसेकें-२०२६/प्र.क्र.६३/मातं दिनांक: २३ जून, २०२६. (E-1602482)
१०. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.
११. डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण अधिनियम, २०२३.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र शासनाने गेल्या काही वर्षांत आपले सरकार सेवा केंद्रे, आपले सरकार नागरी सेवा केंद्रे, तसेच आपले सरकार ग्रामपंचायत सेवा केंद्रे यांचे एक सक्षम जाळे राज्यभर उभारले आहे. ही केंद्रे एकत्रितरित्या राज्यातील नागरिक व शासकीय सेवा यांच्यामधील प्राथमिक संपर्क-बिंदू म्हणून कार्य करीत आहेत.

सदर केंद्रांचा सातत्याने विस्तार होत असल्याने, सदर केंद्रांचे वर्गीकरण, कामगिरीचे मूल्यमापन व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या केंद्रांचा सन्मान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासाठी सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या केंद्रांची दखल घेऊन त्यांचा गौरव करणे, केंद्र चालकांमध्ये निकोप स्पर्धेची भावना निर्माण करणे आणि राज्यातील नागरिकांना उच्च दर्जाच्या सेवा देण्यास प्रोत्साहन देण्यासाठी खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:**

राज्य शासनामार्फत आपले सरकार सेवा केंद्रे, आपले सरकार ग्रामपंचायत सेवा केंद्रे मोठ्या प्रमाणात मंजूर केली असून त्यांचेमार्फत नागरीकांना विविध सेवा देण्याचे काम करण्यात येत आहे. सदर केंद्रांमध्ये गुणवत्ता वाढीस लावून नागरिकांना मिळणाऱ्या सेवांचा दर्जा वाढविण्यासाठी व आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये स्पर्धा वाढीला लावून उत्कृष्ट केंद्रांचा सन्मान करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

**१. आपले सरकार सेवा केंद्रांचे वर्गीकरण:**

आपले सरकार सेवा केंद्रांमधील समान कार्यप्रणाली असलेल्या सेवा केंद्रांची समानतेच्या तत्वाने तुलना करण्याकरिता आपले सरकार सेवा केंद्रांचे खालीलप्रमाणे ३ गटात वर्गीकरण करण्यात येत आहे.

(अ) गट १ - आपले सरकार सेवा केंद्रे

(ब) गट २ - आपले सरकार नागरी सेवा केंद्रे (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत कार्यक्षेत्रातील)

(क) गट ३ - आपले सरकार ग्रामपंचायत सेवा केंद्रे

**२. आपले सरकार सेवा केंद्रांच्या निवडीचे निकष:**

आपले सरकार सेवा केंद्राचे प्रत्येक महिन्याकरिता खालील चार निकषांच्या आधारे मूल्यमापन करण्यात येईल. ज्या केंद्राने मूल्यमापन कालावधीच्या महिन्यात सर्व चार निकष पूर्ण केले आहेत, असे केंद्र मानांकनासाठी पात्र समजण्यात येईल. मासिक मूल्यमापनाची नोंद डॅशबोर्डवर ठेवली जाईल; अंतिम पुरस्कार निवड परिच्छेद १३ अनुसार वार्षिक कालावधीच्या (जानेवारी ते डिसेंबर) एकत्रित कामगिरीवर आधारित असेल.

| अ.क्र. | निकष | किमान मर्यादा |
|---|---|---|
| १ | अर्ज संख्या | प्रति माह ७५ किंवा त्याहून अधिक अर्ज |
| २ | कार्यरत दिवस | प्रति माह १५ किंवा त्याहून अधिक दिवस |
| ३ | अर्ज मुदतीत मंजूर दर<br>$\frac{\text{(मंजूर अर्ज)}}{\text{(मुदतीत मंजूर अर्ज + नामंजूर अर्ज)}} \times १००$ | ९०% किंवा त्याहून अधिक |
| ४ | नागरिकांच्या अभिप्रायावर आधारीत गुण | ५ पैकी ३ रेटिंग किंवा त्याहून अधिक (मूल्यमापन कालावधीच्या प्रत्येक महिन्याची सरासरी) |

**३. मानांकन कार्यपद्धती:**

वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या केंद्रांचे, त्या-त्या जिल्ह्यामधील प्रत्येक गटाकरिता स्वतंत्रपणे मानांकन करण्यात येईल. सदर मानांकन खालील तीन टप्प्यांनुसार करण्यात येईल. यामध्ये प्रत्येक पुढील टप्पा हा त्या आधीच्या टप्प्यात बरोबरीत असल्यासच लागू करण्यात येईल.

| टप्पा | घटक | नियम |
|---|---|---|
| १ | अर्ज मंजूर दर | पात्र केंद्रांचे मानांकन हे अर्ज मंजूर दराच्या उतरत्या क्रमानुसार करण्यात येईल. जिल्ह्यात सर्वाधिक दर असलेल्या केंद्रास प्रथम क्रमांक देण्यात येईल. |
| २ | एकूण निकाली अर्ज | दोन किंवा अधिक केंद्रांचा अर्ज मंजूर दर समान असल्यासच हा घटक लागू होईल. अशा केंद्रांमध्ये जास्त अर्ज निकाली काढणाऱ्या केंद्राचा क्रमांक वरचा राहील. |
| ३ | सरासरी नागरिक अभिप्राय गुण | वरील दोन्ही घटकांत बरोबरी असल्यासच हा घटक लागू होईल. अशा केंद्रांमध्ये अधिक सरासरी नागरिक अभिप्राय गुण असलेल्या केंद्राचा क्रमांक वरचा राहील. |
| | वरील तिन्ही घटकांमध्ये दोन किंवा अधिक केंद्रे एकसमान आढळल्यास, त्यांना समान क्रमांक देण्यात येईल आणि मानांकनासाठी विचारात घेण्यात येतील. | |

**टीप:** ज्या केंद्रांविरुद्ध लक्षणीय संख्येने तक्रारी अथवा प्रतिकूल अहवाल नोंदविले गेले आहेत, अशा केंद्रांचा नामनिर्देशनासाठी विचार करण्यात येणार नाही. यासंदर्भातील मूल्यांकन जिल्हा प्रशासनाकडून स्व-विवेकाधिकारानुसार करण्यात येईल.

**उदाहरणादाखल तक्ता:**

खालील तक्त्यात एकाच जिल्ह्यातील पाच केंद्रे दर्शविली आहेत, ज्यामध्ये सर्व केंद्रे मानांकनासाठी पात्र ठरली आहेत. त्यामध्ये, मानांकन प्रक्रिया खालीलप्रमाणे टप्प्याटप्प्याने लागू करण्यात आली आहे.

| केंद्र | मंजूर दर | एकूण अर्ज | सरासरी अभिप्राय (५ पैकी) | अंतिम क्रमांक | कारण |
|---|---|---|---|---|---|
| केंद्र अ | ९६% | १२०० | ३.२ | १ | जिल्ह्यातील सर्वाधिक अर्ज मंजूर दर. |
| केंद्र ब | ९४% | १८०० | ३.५ | २ | क व ड यांचे समान अर्ज मंजूर दर असून, अधिक अर्ज निकाली काढल्यामुळे ब केंद्राचा दोघांच्या वरचा क्रमांक. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| केंद्र ड | ९४% | १५०० | ३.३ | ३ | ब व क यांचे समान अर्ज मंजूर दर; ब पेक्षा कमी अर्ज; नागरिकांच्या अधिक अभिप्राय गुणामुळे क च्या वरचा क्रमांक. |
| केंद्र क | ९४% | १५०० | ३.१ | ४ | ब व ड यांचे समान मंजूर दर; ब पेक्षा कमी अर्ज; ड पेक्षा कमी अभिप्राय गुण. त्यामुळे क केंद्राचा खालचा क्रमांक |
| केंद्र इ | ९१% | २००० | ३.८ | ५ | सर्वाधिक अर्ज संख्या व अभिप्राय गुण असूनही सर्वात कमी मंजूर दर असल्याने इ केंद्राचा अंतिम क्रमांक. |

**४. जिल्हा स्तरावरुन आपले सरकार सेवा केंद्रांचे मानांकनासाठी नामनिर्देशन:**

वरील प्रमाणे तयार केलेल्या मानांकन यादीच्या आधारे, प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक गटातील वरच्या दहा क्रमांकाच्या केंद्रांना सन्मानासाठी नामनिर्देशित करण्यात येईल. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी तीन गटांमधून एकूण ३० केंद्रांचा नामनिर्देशन गट तयार होईल. सदर नामनिर्देशित केंद्रांची यादी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळातर्फे (महाआयटी) संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पडताळणी व मान्यतेसाठी पाठविण्यात येईल.

**५. पायाभूत सुविधा उपलब्धतेची पडताळणी:**

उपरोक्त प्रमाणे नामनिर्देशित केलेल्या केंद्रांची पायाभूत सुविधा उपलब्धतेची पडताळणी विहित केलेल्या पायाभूत सुविधा मानकांच्या अनुषंगाने करण्यात येईल. सदर पडताळणी खालीलप्रमाणे करण्यात येईल:

(अ) पायाभूत सुविधेच्या उपलब्धतेची पडताळणी करण्यासाठी महाआयटी व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अधिनस्त एका अधिकाऱ्याची समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात येईल.

(ब) राज्य शासनातर्फे महाआयटी मार्फत पडताळणी कार्यवाही करिता प्रमाणित ऑनलाईन नमुना यथावकाश तयार करुन पुरविण्यात येईल. सदर नमुन्यात विहित तपासणी सूची व प्रत्येक बाबींकरिता भौगोलिक-चिन्हांकित (Geo-tagged) छायाचित्रे अपलोड करण्याची तरतूद असेल. सदर नमुना तयार झाल्यानंतर, प्रत्येक पडताळणी कालावधीच्या सुरुवातीपूर्वी तो प्रत्येक जिल्ह्याला उपलब्ध करून देण्यात येईल. तपासणी अधिकारी यांनी सेवा केंद्र चालकास काही अडचणी असल्यास त्या स्वतंत्रपणे सक्षम प्राधिकरणास कळवावे.

प्रत्यक्ष पडताळणीसाठीचे निकष खालीलप्रमाणे असतील:

| अ.क्र. | तपासणी सूचीतील बाब | समन्वयकासाठी प्रश्नावली | |
|---|---|---|---|
| **प्रशासकीय व स्थान विषयक माहिती** | | | |
| १ | जिल्हा | | |
| २ | तालुका | | |
| ३ | गाव | | |
| ४ | निरीक्षकाचे नाव | | |
| ५ | पदनाम | | |
| ६ | केंद्रचालकाचे नाव | | |
| ७ | केंद्रचालकाचा भ्रमणध्वनी क्रमांक | | |
| ८ | केंद्राचे नाव | | |
| ९ | केंद्राचा विशिष्ट ओळख क्रमांक | | |
| **विभाग १: आपले सरकार सेवा केंद्राची स्थिती** | | | |
| १ | कार्यान्वयन स्थिती | भेटीच्या वेळी केंद्र सुरू व कार्यरत आहे काय? | होय / नाही |
| २ | अधिसूचित पत्त्यावर कार्यरत | केंद्र हे महाआयटीकडे नोंदविलेल्या पत्त्यावर कार्यरत आहे काय? | होय / नाही |
| ३ | नामफलकाची स्थिती | आपले सरकारचा नामफलक लगतच्या सार्वजनिक रस्त्यावरून कोणत्याही अडथळ्याशिवाय स्पष्ट दिसतो काय? | होय / नाही |
| ४ | नामफलकाचे विहित स्वरुप | नामफलक हा शासन निर्णयात विहित केलेल्या रंग, अक्षरसंरचना व मांडणीनुसार आहे काय? | होय / नाही |
| **विभाग २: पायाभूत व तांत्रिक सुविधा उपलब्धता** | | | |
| १ | इंटरनेट सुविधा | ग्रामीण केंद्रासाठी इंटरनेट जोडणी १० MBPS तसेच नागरी केंद्रासाठी २० MBPS किंवा त्याहून अधिक आहे काय? (वेग चाचणी साधनाद्वारे पडताळणी करावी) | होय / नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | संगणक | केंद्रात कार्यरत संगणक उपलब्ध आहेत काय? | होय / नाही |
| ३ | प्रिंटर | केंद्रात कार्यरत प्रिंटर उपलब्ध आहेत काय? | होय / नाही |
| ४ | स्कॅनर | केंद्रात कार्यरत स्कॅनर उपलब्ध आहे काय? | होय / नाही |
| ५ | वेबकॅमेरा | केंद्रात कार्यरत वेबकॅमेरा उपलब्ध आहे काय? | होय / नाही |
| ६ | बायोमेट्रिक उपकरण | केंद्रात कार्यरत बायोमेट्रिक उपकरण (बोटांचे ठसे वाचक, डोळ्याचा पटल स्कॅनर) उपलब्ध आहे काय? | होय / नाही |
| ७ | कायमस्वरूपी बांधकाम | केंद्र हे कायमस्वरूपी पक्क्या बांधकामाच्या इमारतीमध्ये कार्यरत आहे काय ? | होय / नाही |
| ८ | केंद्राचे क्षेत्रफळ | केंद्र विहित किमान क्षेत्रफळाचे निकष पूर्ण करते काय? (आपले सरकार सेवा केंद्राकरिता किमान १०० चौ.फुट जागा आवश्यक.) | होय / नाही |
| ९ | अखंडीत वीजपुरवठा | केंद्रास अखंडित वीजपुरवठा आणि कार्यरत बॅकअप व्यवस्था यांची सोय उपलब्ध आहे काय? | होय / नाही |
| १० | कर्मचाऱ्यांसाठी आसनव्यवस्था | केंद्रामध्ये चालक व कर्मचारी यांना बसण्यासाठी आवश्यक तेवढ्या टेबल व खुर्च्या उपलब्ध आहेत का? | होय / नाही |
| **विभाग ३: नागरिकांसाठी सुविधा** | | | |
| १ | बैठक व्यवस्था | केंद्रात किमान बैठक व्यवस्था उपलब्ध आहे काय? (आपले सरकार सेवा केंद्र किंवा आपले सरकार नागरी सेवा केंद्राकरिता किमान ४ आसने; आपले सरकार ग्रामपंचायत सेवा केंद्राकरिता किमान २ आसने.) | होय / नाही |
| २ | पिण्याचे पाणी | केंद्रात नागरिकांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध आहे काय? | होय / नाही |
| ३ | परिसर स्वच्छता व प्रकाश व्यवस्था | केंद्राचा परिसर स्वच्छ व पुरेसा प्रकाशमान आहे काय? | होय / नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | दिव्यांग प्रवेशासाठी रॅम्प | व्हीलचेअरच्या प्रवेशासाठी प्रवेशद्वारी रॅम्प उपलब्ध आहे काय? (केवळ आपले सरकार नागरी सेवा केंद्रांना लागू) | होय / नाही |
| **विभाग ४: सेवा वितरण** | | | |
| १ | पोचपावती | अर्ज दाखल केल्यानंतर नागरिकास तात्काळ मुद्रीत किंवा डिजिटल स्वरूपातील पोचपावती दिली जाते काय? | होय / नाही |
| २ | सेवा सूची व लोकसेवा हक्क कालमर्यादा व अपील तरतूद दर्शक फलक | प्रमुख सेवांची यादी व त्यांच्या लोकसेवा हक्क कालमर्यादा व अपिल तरतूद नागरिकांसाठी ठळकपणे प्रदर्शित केल्या आहेत काय? | होय / नाही |

(क) प्रत्येक समन्वयक हे महसूल विभागातर्फे अधिसूचित केलेल्या पडताळणी कालावधीत (२ आठवडे) त्यांच्या जिल्ह्यातील नामनिर्देशित ३० केंद्रांना प्रत्यक्ष भेट देऊन प्रत्येक मूल्यांकन केलेल्या केंद्रासाठी डिजिटल नमुना भरुन सादर करतील.

(ड) ज्या केंद्राच्या बाबतीत विहित तपासणी सूचीतील कोणतीही लागू बाब पूर्ण होणार नाही, असे केंद्र सदर कार्यपद्धतीच्या प्रयोजनार्थ पायाभूत सुविधा अनुपालन निकष पूर्ण न करणारे समजले जाईल आणि त्यानुसार मानांकन प्रक्रियेतून त्यास वगळण्यात येईल.

(इ) पडताळणी कार्यवाहीसाठी आलेला खर्च, यामध्ये जिल्हास्तरीय समन्वयकांचा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता यांचा समावेश आहे, हा संबंधित जिल्हा प्रशासनाने जिल्हा सेतू सोसायटीच्या तरतूदीतून भागविणे आवश्यक राहील.

(ई) नामनिर्देशन गटाबाहेरील केंद्रांची पडताळणी ही संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाची जबाबदारी राहील आणि वरील संदर्भ क्रमांक ९ मधील शासन निर्णयात विहित संनियंत्रण कार्यपद्धतीनुसार त्याबाबतचा अहवाल दरवर्षी दि. २६ जानेवारीपूर्वी सादर करणे बंधनकारक राहील.

**६. जिल्हास्तरीय निवड:**

आपले सरकार सेवा केंद्रांच्या पायाभूत सुविधा अनुपालन पडताळणी पूर्ण झाल्यानंतर, महाआयटीतर्फे संबंधित जिल्हा प्रशासनाशी विचारविनिमय करून प्रत्येक जिल्ह्यातून प्रत्येक गटाकरिता सर्वोत्कृष्ट ३ केंद्रांची अंतिम निवड करण्यात येईल. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यातून तीन गटांमध्ये मिळून एकूण ९ केंद्रे जिल्हास्तरीय सन्मानासाठी पात्र राहतील.

**७. विभागस्तरीय निवड:**

जिल्हा स्तरावर सन्मानासाठी पात्र ठरलेल्या केंद्रांचा विभाग स्तरावर निवडीसाठी विचार करण्यात येईल. त्यासाठी पात्र केंद्रांचे पुनर्मुल्यांकन करण्यात येईल. महाआयटीतर्फे संबंधित विभागीय आयुक्त यांच्याशी विचारविनिमय करून प्रत्येक विभागातून प्रत्येक गटाकरिता सर्वोत्कृष्ट ३ केंद्रांची अंतिम निवड करण्यात येईल. त्यानुसार प्रत्येक विभागातून तीन गटांमध्ये मिळून एकूण ९ केंद्रे विभागस्तरीय सन्मानासाठी पात्र राहतील. सदर पुनर्मुल्यांकन परिच्छेद २ मधील चार निकष व परिच्छेद ३ मधील मानांकन कार्यपद्धतीच्या आधारे, मूल्यमापन कालावधीच्या एकत्रित आकडेवारीवर करण्यात येईल.

**८. राज्यस्तरीय निवड:**

विभागस्तरावर सन्मानासाठी पात्र ठरलेल्या केंद्रांचा राज्यस्तरीय सन्मानासाठीचा पात्र गट म्हणून विचारात घेण्यात येईल. त्यासाठी पात्र केंद्रांचे पुनर्मुल्यांकन करण्यात येईल. त्यानुसार प्रत्येक गटाकरीता सर्वोत्कृष्ट तीन केंद्रांची अंतिम निवड करण्यात येईल. त्यानुसार राज्यस्तरावर तीन गटांमध्ये मिळून एकूण ९ केंद्रे सन्मानासाठी पात्र राहतील. सदर पुनर्मुल्यांकन परिच्छेद २ मधील चार निकष व परिच्छेद ३ मधील मानांकन कार्यपद्धतीच्या आधारे, मूल्यमापन कालावधीच्या एकत्रित आकडेवारीवर करण्यात येईल.

**९. समन्वय समिती:**

विविध स्तरावर प्रत्येक गटातून सर्वोत्कृष्ट केंद्रांची निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय समन्वय समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समिती विविध स्तरावर निवडावयाच्या केंद्रांच्या कार्यपध्दतीबाबत तसेच वेळापत्रकाबाबत जिल्हा व विभागीय स्तरावर समन्वय साधण्याचे काम करेल.

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १. | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग | अध्यक्ष |
| २. | आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय | सदस्य |
| ३. | व्यवस्थापकीय संचालक, महाआयटी | सदस्य |
| ४. | उप सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग | सदस्य सचिव |

**१०. आपले सरकार सेवा केंद्र डॅशबोर्ड:**

आपले सरकार सेवा केंद्रांच्या कामगिरीचे सातत्यपूर्ण संनियंत्रण करण्याकरिता आणि आवश्यकता वाटेल तेथे वेळोवेळी सुधारणात्मक कार्यवाही करण्याकरीता, सेवा केंद्र डॅशबोर्ड विकसित करण्यात येईल. सदर डॅशबोर्ड महाआयटीमार्फत विकसन व देखभाल करण्यात येईल आणि यथावकाश तो सर्व जिल्ह्यांना उपलब्ध करून देण्यात

येईल. सदर डॅशबोर्डवर प्रवेशासाठीचे लॉगीन तपशील महाआयटीतर्फे राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील संबंधित अधिकाऱ्यांना वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येतील.

**११. सेवा केंद्रांचे वर्ग:**

आपले सरकार सेवा केद्रांच्या सातत्यपूर्ण संनियंत्रणाकरिता आणि राज्यभर एकसमान मूल्यमापन पद्धती निश्चित करण्यासाठी, सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद चार निकष आणि परिच्छेद क्र. ५ मध्ये नमूद पायाभूत सुविधा अनुपालन विचारात घेऊन, परिच्छेद १ मध्ये समाविष्ट प्रत्येक सेवा केंद्राचे खालीलप्रमाणे वर्ग निश्चित करण्यात येतील:

| अ.क्र. | सेवा केंद्रांचे वर्ग | वर्णन |
|---|---|---|
| १ | स्मार्ट केंद्र | परिच्छेद २ मधील सर्व निकष आणि परिच्छेद ५ मधील सर्व पायाभूत सुविधा अनुपालन या दोन्हींची पूर्तता करणारी केंद्रे. अशा केंद्रांना सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद १४ मध्ये नमूद केल्यानुसार सन्मानासाठी पात्र समजले जाईल. सदर घोषणा प्रत्येक मूल्यमापन वर्षाच्या (जानेवारी ते डिसेंबर) आधारावर करण्यात येईल. सदर केंद्राचा दर्जा एक वर्षासाठी कायम राहील. |
| २ | सक्षम (निरंतर) | परिच्छेद २ मधील सर्व निकष पूर्ण करणारी, परंतु परिच्छेद ५ मधील संपूर्ण पायाभूत सुविधा अनुपालन **पूर्ण न करणारी** केंद्रे. |
| ३ | उदयोन्मुख (निरंतर) | परिच्छेद २ मधील तीन निकष पूर्ण करणारी केंद्रे (पायाभूत सुविधा अनुपालन आवश्यकतेसह किंवा शिवाय). |
| ४ | प्रयत्नशील (निरंतर) | परिच्छेद २ मधील दोन किंवा त्यापेक्षा कमी निकष पूर्ण करणारी केंद्रे (पायाभूत सुविधा अनुपालन आवश्यकतेसह किंवा शिवाय). |

उपरोक्त प्रमाणे वर्गीकरण केल्यानुसार स्मार्ट केंद्र म्हणून एखाद्या केंद्राचे वर्गीकरण हे प्रत्येक मूल्यमापन सत्राच्या समाप्तीनंतर सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद १४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वर्षाच्या (जानेवारी ते डिसेंबर) आधारावर करण्यात येईल. अशा घोषित केंद्रांना परिच्छेद १४ मध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार सन्मानासाठी पात्र समजले जाईल. सक्षम, उदयोन्मुख व प्रयत्नशील या वर्गीकरणातील केंद्रांचे वर्गीकरण आपले सरकार सेवा केंद्र डॅशबोर्डवर मासिक आधारावर, मागील तीन महिन्यांच्या कामगिरीच्या मूल्यमापनाद्वारे अद्ययावत करण्यात येईल.

**१२. सेवा केंद्र आढावा कार्यपध्दती:**

वरील परिच्छेद १० मध्ये नमूद वर्गीकरणाच्या आधारे, राज्य, जिल्हा व तालुका स्तरांवर खालीलप्रमाणे सेवा केंद्र कामगिरीचा कालबद्ध आढावा घेण्यात येईल:

| अ.क्र. | आढावा | आढावा घेणारे अधिकारी | आढाव्याशी संबंधित अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | त्रैमासिक राज्यस्तरीय आढावा | सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग | जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद |
| २ | मासिक जिल्हास्तरीय आढावा | जिल्हाधिकारी | उप-विभागीय अधिकारी, तहसीलदार व गट विकास अधिकारी |
| ३ | मासिक तालुकास्तरीय आढावा | उप-विभागीय अधिकारी | क्षेत्रीय अधिकारी व केंद्र चालक, यामध्ये संबंधित केंद्र चालक व ग्रामसेवक यांचा समावेश असेल |

वरील विहित आढाव्यांव्यतिरिक्त, संबंधित आढावा घेणाऱ्या प्राधिकाऱ्यांना आवश्यकतेनुसार वेळोवेळी अन्य आढावे घेण्याची मुभा असेल.

**१३. मूल्यमापन कालावधी :**

विविध स्तरावर निवडावयाच्या आपले सरकार सेवा केंद्रांच्या मूल्यमापनासाठी जानेवारी ते डिसेंबर या कालावधीतील कामगिरीचा आधार घेण्यात येईल. त्यानुसार दरवर्षी २६ जानेवारी रोजी निवड झालेल्या केंद्रांचा सन्मान करण्यात येईल.

**१४. सन्मानाचे स्वरुप :**

उपरोक्त प्रमाणे निवडलेल्या केंद्रांना जिल्हा, विभाग व राज्य स्तरांवर खालीलप्रमाणे सन्मानीत करण्यात येईल.

| स्तर | सन्मान देणारे प्राधिकारी | केंद्रांची संख्या | पुरस्कार व सन्मान |
|---|---|---|---|
| राज्यस्तर | शासन स्तरावर | राज्यस्तरावर आपले सरकार सेवा केंद्रे, आपले सरकार नागरी सेवा केंद्रे व आपले सरकार ग्रामपंचायत सेवा केंद्रे या तीन गटातून | • निवड झालेल्या केंद्राला **राज्यस्तरीय स्मार्ट केंद्र** दर्जा एक वर्षासाठी बहाल करण्यात येईल.<br>• निवड झालेल्या प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या केंद्रांना |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रत्येकी प्रथम, द्वितीय व तृतीय असे एकूण ९ केंद्रांना पुरस्कृत करण्यात येईल. | अनुक्रमे रु.५१,०००, रु.४१,००० व रु.३१,००० रोख पारितोषिक प्रदान करण्यात येईल. |
| विभाग स्तर | विभागीय आयुक्त | प्रत्येक विभागीय स्तरावर आपले सरकार सेवा केंद्रे, आपले सरकार नागरी सेवा केंद्रे व आपले सरकार ग्रामपंचायत सेवा केंद्रे या तीन गटातून प्रत्येकी प्रथम, द्वितीय व तृतीय असे एकूण ९ केंद्रांना पुरस्कृत करण्यात येईल. | • निवड झालेल्या केंद्राला **विभागस्तरीय स्मार्ट केंद्र** दर्जा एक वर्षासाठी बहाल करण्यात येईल.<br>• निवड झालेल्या प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या केंद्रांना अनुक्रमे रु.३१,०००, रु.२५,००० व रु.२१,००० रोख पारितोषिक प्रदान करण्यात येईल. |
| जिल्हा | जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | जिल्हा स्तरावर आपले सरकार सेवा केंद्रे, आपले सरकार नागरी सेवा केंद्रे व आपले सरकार ग्रामपंचायत सेवा केंद्रे या तीन गटातून प्रत्येकी प्रथम, द्वितीय व तृतीय असे एकूण ९ केंद्रांना पुरस्कृत करण्यात येईल. | • निवड झालेल्या केंद्राला **जिल्हास्तरीय स्मार्ट केंद्र** दर्जा एक वर्षासाठी बहाल करण्यात येईल.<br>• निवड झालेल्या प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या केंद्रांना अनुक्रमे रु. २१,०००, रु. १५,००० व रु. ११,००० रोख पारितोषिक प्रदान करण्यात येईल. |

**टीप :** स्मार्ट सेवा केंद्र पुरस्कार प्राप्त केंद्रांना त्या वर्षात पुन्हा स्पर्धेमध्ये भाग घेता येणार नाही. राज्यस्तरीय स्मार्ट केंद्र पुरस्कार प्राप्त झालेल्या केंद्रास पुढील एका मूल्यमापन वर्षात राज्यस्तरीय स्पर्धेसाठी विचारात घेण्यात येणार नाही. तथापि, जिल्हा व विभागीय स्तरांवर निवड झालेली केंद्रे त्याच वर्षात पुढील स्तरांवरील स्पर्धेसाठी पात्र राहतील.

**१५. सन्मानीत केंद्रांची प्रसिध्दी :**

उपरोक्त प्रमाणे राज्यस्तरावर, विभागीय स्तरावर व जिल्हा स्तरावर निवड झालेल्या आपले सरकार सेवा केंद्रांची नावे तपशिल आपले सरकार पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येतील.

**१६. आर्थिक तरतूद :**

विविध स्तरावर निवडण्यात आलेल्या आपले सरकार सेवा केंद्रांचा सन्मान करण्यासाठी तसेच रोख पारितोषिकासाठी सेतू सोसायटी मधील उपलब्ध तरतूदीमधून खर्च भागविण्यात यावा.

**१७. कार्यान्वयन :**

सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) ही नोडल यंत्रणा राहील. महाआयटीने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:

(अ) आपले सरकार सेवा केंद्र डॅशबोर्ड विकसन, देखभाल व संचलीत करणे आणि सर्व आपले सरकार सेवा केंद्रांच्या कामगिरी डेटाचे सातत्यपूर्ण व अचूक संकलन सुनिश्चित करणे.

(ब) आपले सरकार सेवा केंद्र डॅशबोर्डसाठीचे लॉगीन तपशील जिल्हाधिकारी व संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांना उपलब्ध करून देणे.

(क) प्रत्येक मूल्यमापन कालावधीसाठी व प्रत्येक गटासाठी स्वतंत्रपणे जिल्हानिहाय, विभागनिहाय व राज्यस्तरीय निवड याद्या तयार करणे व प्रकाशित करणे.

(ड) पायाभूत सुविधा अनुपालन पडताळणीसाठीचा प्रमाणित डिजिटल नमुना डिजीटल स्वरुपात ऑनलाईन तयार करून पडताळणी कालावधीच्या सुरुवातीपूर्वी तो प्रत्येक जिल्ह्याला उपलब्ध करून देणे.

(इ) पडताळणी कार्यवाही व जिल्हास्तरीय सन्मान सोहळ्यांच्या आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाशी समन्वय राखणे.

(ई) राज्य निवड समितीचे आयोजन करणे आणि राज्यस्तरीय सन्मान सोहळ्याचे आयोजन सुलभपणे पार पाडणे.

(फ) राज्यस्तरावर, विभागीय स्तरावर व जिल्हा स्तरावर निवड झालेल्या आपले सरकार सेवा केंद्रांची नावे आपले सरकार संकेतस्थळावर प्रकाशित करणे.

१८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०६२३१२२९२५२६११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD
POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI,
2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.06.23 12:30:55 +05'30'

**(दुर्गाप्रसाद मैलावरम)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. उप मुख्यमंत्री ( नगर विकास व गृहनिर्माण ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
९) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
१०) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११) शासनाचे सर्व मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१३) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१४) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१६) सर्व पोलीस आयुक्त,
१७) सर्व विभागीय आयुक्त,
१८) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२०) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
२१) सर्व जिल्हाधिकारी,
२२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२३) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,
२४) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२५) आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय, मंत्रालय, मुंबई.
२६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्या., मुंबई
२७) निवडनस्ती/TECH-१